N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** रायगड  **P.S.(ठाणे):** अलीबाग

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0027  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/02/2024 02:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 22/02/2024

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2024

**Time From (वेळेपासून):** 16:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/02/2024  **Time (वेळ):** 18:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/02/2024 01:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलि, अलिबाग,अलिबाग

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रणाली किशोर म्हात्रे
(b) **Husband's Name (पती चे नाव) :** किशोर म्हात्रे
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जसखार,उरण,अलीबाग,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उपसरपंच, ग्रामपंचायत जसखार,जसखार,उरण,अलीबाग,रायगड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7977608754

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रेश्मा ओंकार नाईक | | पालक का नाम : ओंकार नाईक | 1. रूम नं302,प्लट नं 166 सेनं 23,पंचवटी कऑप हौसोसा,, जुईनगर,नवी मुंबई ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सतिश वसंत कांबळे | | पालक का नाम : वसंत कांबळे | 1. रूम नं01,,श्रीबाग तळमजला,, पारिजात सोसायटी,,अलिबाग, अलिबाग,अलीबाग,रायगड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अलिबाग पोलिस ठाणे गुन्हा रजिस्टर नं.27/2024 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन 1988(संशोधन सन 2018 ) चे कलम 7, 7 (अ), 12 प्रमाणे
फिर्यादी - प्रणाली किशोर म्हात्रे, वय 24 वर्षे, उपसरपंच, ग्रामपंचायत जसखार, ता. उरण, जि. रायगड रा. मु. जसखार, पोस्ट जे.एन.पी.टी, ता. उरण, जि. रायगड मो.नं. 7977608754
आरोपी- 1.श्रीमती.रेश्मा ओंकार नाईक, वय 31 वर्षे (वर्ग 2) सहायक अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती उरण, जि. रायगड रा. रूम नं.302, पंचवटी कॉ.ऑप. हौ.सोसा, प्लॉट नं. 166, से.नं. 23, जुईनगर, नवी मुंबई . 2 श्री. सतिश वसंत कांबळे वय 52 वर्षे, सहायक अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अलिबाग, जि. रायगड रा. रूम नं.01,पारिजात सोसायटी, श्रीबाग तळमजला, अलिबाग, जि.रायगड
घडला तारीख वेळ व ठिकाण- दिनांक 22/02/2024 रोजी 16.55वाजताचे सुमारास मौजे बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलिबाग कार्यालय ता.अलिबाग, जि. रायगड.
हकिगत-तक्रारदार श्रीमती प्रणाली किशोर म्हात्रे, वय 24 वर्षे, उपसरपंच, ग्रामपंचायत जसखार, ता. उरण, जि. रायगड रा. मु. जसखार, पोस्ट जे.एन.पी.टी, ता. उरण, जि. रायगड यांनी समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालय येथे दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 08/02/2024 रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेविका श्रीमती. रेश्मा ओंकार नाईक, वय 31 वर्षे, (वर्ग 2) सहायक अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती उरण, जि. रायगड रा. रूम नं.302, पंचवटी को.ऑप. हौ.सोसा, प्लॉट नं. 166, से.नं. 23, जुईनगर, नवी मुंबई यांनी तक्रारदार यांचेकडे जसखार गाव उरण येथील विकास कामाचे अंदाजपत्रक मंजूरीच्या कामाकरीता रु. 30,000/- लाचेची रक्कमेची स्वतः करीता व लोकसेवक श्री. कांबळे यांचेकरीता मागणी करुन तडजोडी अंती रु. 25,000/- लाचेची रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर दिनांक 21/02/2024 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती. रेश्मा नाईक यांनी लाचेची रक्कम बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलिबाग येथील सहायक अभियंता श्री. कांबळे यांच्याकडे देण्यास तक्रारदार यांना सांगुन लाचेची रक्कम लोकसेवक श्री.कांबळे यांचेकडे देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिले. त्यानुसार दिनांक 22/02/2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान श्री. सतिश वसंत कांबळे वय 52 वर्ष, सहायक अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अलिबाग, जि. रायगड रा. रूम नं.01,पारिजात सोसायटी, श्रीबाग तळमजला, अलिबाग, जि.रायगड यांनी तक्रारदार यांचेकडून रु. 25,000/- लाचेची रक्कम बांधकाम विभाग जिल्हा परिशद अलिबाग कार्यालयात स्विकारली असता त्यांना 16.55 वाजता रंगेहाथ पकडण्यात आलेले म्हणुन गुन्हा अलिबाग पोलिस ठाणे गुन्हा रजिस्टर नं.27/2024 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन 1988 (संशोधन सन 2018 ) चे कलम 7, 7 (अ), 12 प्रमाणे
फिर्यादी - प्रणाली किशोर म्हात्रे, वय 24 वर्षे, उपसरपंच, ग्रामपंचायत जसखार, ता. उरण, जि. रायगड रा. मु. जसखार, पोस्ट जे.एन.पी.टी, ता. उरण, जि. रायगड मो.नं. 7977608754
आरोपी- 1.श्रीमती.रेश्मा ओंकार नाईक, वय 31 वर्षे (वर्ग 2) सहायक अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती उरण, जि. रायगड रा. रूम नं.302, पंचवटी कॉ.ऑप. हौ.सोसा, प्लॉट नं. 166, से.नं. 23, जुईनगर, नवी मुंबई . 2 श्री. सतिश वसंत कांबळे वय 52 वर्षे, सहायक अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अलिबाग, जि. रायगड रा. रूम नं.01,पारिजात सोसायटी, श्रीबाग तळमजला, अलिबाग, जि.रायगड
घडला तारीख वेळ व ठिकाण- दिनांक 22/02/2024 रोजी 16.55वाजताचे सुमारास मौजे बांधकाम विभाग

जिल्हा परिषद अलिबाग कार्यालय ता.अलिबाग, जि. रायगड.
हकिगत- मी प्रणाली किशोर म्हात्रे, वय 24 वर्षे, उपसरपंच, ग्रामपंचायत जसखार, ता. उरण, जि. रायगड रा. मु.
जसखार, पोस्ट जे.एन.पी.टी, ता. उरण, जि. रायगड अशी असुन, समक्ष बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलिबाग -
रायगड कार्यालय येथे हजर राहून फिर्याद लिहून देते की, ( मो.नं. 7977608754)
दिनांक 02/01/2023 रोजी ग्रामपंचायतीच्या सरपंच/उपसरपंचाच्या पदासाठी झालेल्या निवडणूकीत, मी
जसखार गाव, पो.जे.एन.पी.टी., ता. उरण, जि. रायगड येथून उपसरपंच पदासाठी निवडून आलेली आहे. मी
आमच्या गावामध्ये सरकारी योजनेद्ववारे गावाच्या विकासाची कामे करीत असते.
मी तसेच ग्रामपंचायत जसखार मधील सदस्य मिळून मार्च 2023 च्या झालेल्या मासिक सभेमध्ये एकुण 52
विकास कामांचे अंदाज पत्रक तयार करण्याकरीता, गट विकास अधिकारी उरण, पंचायत समिती यांना दिनांक
04/05/2023 रोजी आमच्या ग्रामपंचायत जसखारच्या माध्यमातुन पत्र दिले होते. त्या पत्राच्या आधारे उरण,
पंचायत समिती, बांधकाम विभागाकडून आलेले अधिकारी यांच्याकडून सर्व कामांचे मोजमाप करण्यात आले होते.
परंतु त्यांचे अंदाजपत्रक आमच्या ग्रामपंचायतला दिले नाहीत. आम्ही सुचवलेल्या 52 विकास कामांमधुन अवघ्या 6
कामांचे अंदाजपत्रक प्राप्त झाले. 6 प्राप्त झालेल्या अंदाज पत्रका प्रमाणे ग्रामपंचायतच्या माध्यमातुन निवीदा प्रक्रिया
पुर्ण करण्यात आली. त्यानंतर डिसेंबर 2023 ला आणखी 3 कामांची अंदाज पत्रक प्राप्त झाली व त्याची देखील
निवीदा प्रक्रिया ग्रामपंचायतच्या माध्यमातुन करण्यात आली. परंतु माझे वॉर्ड मधील एकाही कामाचे अंदाजपत्रक प्राप्त
न झाल्यामुळे मी दिनांक 25/01/2024 रोजी पंचायत समिती, उरण बांधकाम विभागात जाऊन तेथील अधिकारी
अभियंता श्रीमती. रेश्मा नाईक यांची भेट घेवून आमच्या कामांसदर्भात विचारणा केली तर त्यांनी मला असे
सांगितले की, 'काही अंदाजपत्रके तयार झालेत व काही अंदाजपत्रकांचे काम चालू आहे.'
त्यानंतर मी आमच्या ग्रामपंचायतच्या माध्यमातुन दिलेल्या पत्रामधुन त्यांच्याकडे मागणी केलेली माझे वॉर्डमधील
अत्यंत महत्वाची कामे सिरीयल क्रं 3,5,46 यांचे अंदाजपत्रक मला लवकरात लवकर दयावे अशी श्रीमती नाईक
यांना विनंती केली. त्यानंतर त्यांनी मला 'तुमचे अंदाजपत्रक तयार आहेत व त्यावर माझी सही व कव्हरींग लेटर
बाकी आहे'. असे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी दिनांक 31/01/2023 रोजी उरण, पंचायत समितीमध्ये जावून
अभियंता श्रीमती. रेश्मा नाईक यांच्याकडे अंदाज पत्रके मागितली. परंतु त्यांनी 'अंदाज पत्रके तुमच्याकडे देऊ शकत
नाही. त्याची तांत्रिक मंजुरी (टी.एस - टेक्नीकल सॅक्षन) अलिबाग, जि. रायगड येथून घ्यावी लागेल. तुम्ही वरील
दिलेल्या सिरीयल क्रं 3,5,46 या कामांचे अंदाज पत्रका नुसार एकुण मुल्यांकन रू. 52,00,000/- आहे.
त्याकरीता त्या मुल्यांकनाच्या एक टक्के प्रमाणे रू. 52,000/- होतात. तरी तुम्ही रू. 30,000/-रक्कम
माझ्याकडे दया त्यानंतर मी अलिबाग ऑफीसमधून कामांच्या मुल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करून घेते, आणि
तुमच्याकडे देते' असे मला सांगितले. तरी, उरण, पंचायत समिती, बांधकाम विभाग येथिल अभियंता श्रीमती. रेश्मा
नाईक या रू. 30,000/- घेतल्याषिवाय, आमच्या जसखार गावातील ग्रामपंचायतच्या माध्यामातुन दिलेल्या
पत्राद्ववारे त्यांच्याकडे मागणी केलेली आमच्या वॉर्डमधील अत्यंत महत्वाची कामे सिरीयल क्रं 3,5,46 यांचे
अंदाजपत्रक मंजूरीचे काम करणार नाहीत याची मला खात्री झाली. तसेच अभियंता श्रीमती रेश्मा नाईक या मागत
असलेली रू. 30,000/- ही रक्कम, शासकीय फी नसून, लाचेची रक्कम आहे व ती दयायची माझी इच्छा नाही.
म्हणून अभियंता श्रीमती रेश्मा नाईक यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी याबाबत मी दिनांक
08/02/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे समक्ष लेखी तक्रार दिली होती.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाचेची सत्यता पडताळणी करणे करीता पोनि. अरुंधती येळवे, अॅन्टी करप्शन
ब्युरो, नवी मुंबई यांनी लाप्रवि विभागाच्या कार्यप्रणाली प्रमाणे उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, वाशी, नवी मुंबई
येथुन दोन शासकीय पंच साक्षीदार यांची मागणी केल्याप्रमाणे सदर कार्यालयातील दोन पंच साक्षीदार अॅन्टी
करप्शन ब्युरो नवी मुंबई कार्यालयात हजर झाले. त्यावेळी पोनि. अरुंधती येळवे, यांनी सदर पंचाना माझी ओळख
करून देवून त्यांची ओळख मला करून दिली.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषगांने दिनांक 08/02/2024 रोजी लाचेच्या सत्यता पडताळणीकरीता मी डिजीटल
व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्रं. 1 श्रीमती काणे यांचेसह 13.57 वाजता ते 14.14 वाजे दरम्यान उरण, पंचायत
समिती, बांधकाम विभाग येथे जावून अभियंता श्रीमती. रेश्मा नाईक यांची भेट घेतली. त्यावेळी माझे व श्रीमती.
रेश्मा नाईक यांचे कामासंबधी चर्चा झाली. चर्चे दरम्यान श्रीमती. रेश्मा नाईक यांनी '' किती होते टोटल अमाउंट
बोल्लात त्रेपन्न ना?'' असे विचारले असता मी '' बावन्न कायतरी होते ...'' असे सांगितले. त्यावेळी श्रीमती. रेश्मा
नाईक यांनी '' भाऊसाहेब काय बोलले नाय का तुम्हाला....'' असे सांगितले, त्यावेळी मी '' नाय, मी विचारल
त्यांना काय नाय बोलले ते'' असे सांगितले.त्यानंतर श्रीमती. रेश्मा नाईक यांनी त्यांच्याकडील कागदावर पेन्सीलने
30 आकडा लिहिला असता मी '' कधी मग, अजून नाही का कमी होत'' असे बोलले असता श्रीमती. रेश्मा नाईक

यांनी ''नाय ना अजून किती पर्यत याल...नाय आज जर सांगितलात तर आज सहीला ठेवू, आज किंवा उदया सहया होतील'' मग कस करता ते बघा, भाऊसाहेबांकडे दया मग '' असे बोलल्या असता मी'' भाऊ साहेबांकडे देऊ'' असे सांगताच श्रीमती. रेश्मा नाईक यांनी '' चालेल '' त्यावर मी '' ठिक आहे नाय ते परत ग्रामसेवक आणि इकड दया त्यापेक्षा मीच, तुम्हाला... तर त्यादिवषी सांगितला सर्व आम्ही कॉन्ट्रब्युशन काढुन करणार आहोत त्याच्यामुळे...'' असे सांगितले असता श्रीमती. रेश्मा नाईक यांनी '' ठिक आहे चालेल '' असे बोलल्या. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्रीमती काणे असे आम्ही पडताळणी पथकाचे ठिकाणी परत आलो.

माझे व श्रीमती. रेश्मा नाईक यांचे झालेल्या संभाषणा दरम्यान श्रीमती.रेश्मा नाईक यांनी मला 'कागदावर पेन्सीलने लिहून दाखविलेला 30 आकडा' याबाबत डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये लाचेच्या रक्कमेची स्पष्टता न आल्याने, श्रीमती रेश्मा नाईक या लाचेच्या किती रक्कमेची मागणी करीत आहेत, यासंदर्भात संभ्रम असल्याने मला पुन्हा पडताळणी करीता पाठविण्याचा निर्णय पोनि. अरूंधती येळवे यांनी घेतला.

त्यानंतर पुन्हा लाचेच्या तक्रारीची पडताळणी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह मी व पंच क्रं. 1 श्रीमती काणे यांचेसह 15.25 वाजता ते 15.41 वाजे दरम्यान उरण, पंचायत समिती, बांधकाम विभाग येथे जावून अभियंता श्रीमती रेश्मा नाईक यांची भेट घेतली. त्यावेळी मी श्रीमती रेश्मा नाईक यांना '' एका सदस्यांशी कॉन्टॅक्ट नाय झाला ना'' '' तर तुम्ही बोल्लात ना तीस... तीस हजार, तर ते नाही होत आहेत तर आता काय बगा'' पंचवीस वगैरे आता सध्या माझ्याकडे आहेत तेवढे दिले तर '' असे विचारले असता श्रीमती रेश्मा नाईक यांनी '' पाच नंतर करणार का ?'' असे विचारले. त्यावेळी मी पुन्हा रक्कम कमी करण्याची विनंती केली असता श्रीमती रेश्मा नाईक यांनी ''एक्सेप्ट पण करायला पाहिजेत त्यांनी.. नाय होणार हो मॅडम, कसय माहितीये का बावन्न सांगितले होते ना त्यातन पण कमी केलेत बावीस....खुपच कमी झाले ना आपले.... ठिक आहे आता बगा हे तरी आता करताय की नंतर करणार आहात...'' असे बोलले. त्यावेळी मी श्रीमती रेश्मा नाईक यांना 'किती वाजेपर्यत आहात' याबाबत विचारले असता त्यांनी सहा वाजेपर्यत कार्यालयात असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार श्रीमती म्हात्रे यांनी ''अकाउंटला आहेत, तुम्ही मगाशी बोल्लेलेत ते पंचवीसच आहेत, पंचवीस हजार आहेत असे बोलले असता लोकसेविका श्रीमती नाईक यांनी ठिक आहे चालेल असे बोलल्या. त्यावेळी मी,श्रीमती रेश्मा नाईक यांना'' ठिक आहे मग आता हे घेऊन येऊ ?'' असे बोलले असता श्रीमती. रेश्मा नाईक यांनी '' हा चालेल'' असे बोलल्या. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 असे पायी चालत पडताळणी पथकाच्या ठिकाणी परत आलो.

आमचे जसखार गाव, ग्रामपंचायत मधिल विकास कामाचे अंदाज पत्रकाच्या मंजूरीकामा करीता श्रीमती रेश्मा नाईक यांनी रू.30,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती रू. 25,000/-लाचेच्या रक्कमेची मागणी करुन स्विकारण्याचे कबुल केल्याचे निश्पन्न झाल्याने त्यांचेविरूध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोनि. श्रीमती अरूंधती येळवे यांनी पंचासमक्ष मला सापळापुर्व कारवाईबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यावेळी मी पोनि. श्रीमती येळवे यांच्या सुचनेप्रमाणे माझेकडे उपलब्ध असलेली रक्कम रू. 25,000/- (त्यामध्ये रू. 500/- दराच्या 50 भारतीय चलनी नोटा) ही सापळा कारवाई करीता पोनि. श्रीमती येळवे यांच्या समक्ष हजर केली. सापळापुर्व कार्यवाही दरम्यान पोषि. चैलकर यांनी सदर रक्कमेस अॅंथ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा माझे पर्समध्ये ठेवल्या. त्यानंतर पोनि. श्रीमती येळवे यांनी सापळापुर्व कारवाई पुर्ण करून सापळा कारवाईचे अनुशंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. सदरची सापळापुर्व कारवाई षासकीय वाहनामध्ये करण्यात आली. सापळापुर्व कार्यवाही झाल्यानंतर मी लाचेची रक्कम घेवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्रं. 1 श्रीमती काणे यांचे समवेत 16.48 वाजता ते 17.09 वाजे दरम्यान उरण, पंचायत समिती, बांधकाम विभाग येथे जावून अभियंता श्रीमती रेश्मा नाईक यांची भेट घेवून त्यांचेषी कामासबंधाने केलेल्या चर्चे दरम्यान लाचेच्या रक्कमेच्या संबधाने विचारले असता श्रीमती रेश्मा नाईक यांनी '' माझ्याकडे नको.'' असे बोलले. त्यावेळी मी श्रीमती रेश्मा नाईक यांना ''तुम्ही मोजुन घेतल असत तर बरं झाल असत.'' असे बोलले असता श्रीमती रेश्मा नाईक या ''अस काय नाय..'' असे बोलून भाऊसाहेब अलिबागला जातील का असे मला विचारुन श्रीमती रेश्मा नाईक यांनी त्यांचे मोबाईलवरून भाऊसाहेब यांना फोन केला व त्यांना अलिबागला जाणार आहात का याबाबत चर्चा केली. त्यानंतर श्रीमती रेश्मा नाईक या मला''येणार आहेत ना ते...मी जाणार नाही....तुम्ही देशाल त्यांच्याकडे'' असे बोलून ''नको त्यांच्याकडेच दयाना हे पण तुम्हीच दया त्यांना...'' असे बोलले. त्यानंतर मी '' परत मला जायला लागेल. परत ते घेवुन जायला लागेल मला....'' असे सांगितले असता श्रीमती रेश्मा नाईक यांनी ''नाही त्यांनाच देवुन टाका.....ते बोललेत'' असे बोलले.त्यावेळी मी '' अच्छा......चालेल म......तुम्हीच हे घ्या... मी त्यांना सांगते......कि मॅडम कडून घ्या म्हणुन..'' असे सांगितले असता श्रीमती रेश्मा नाईक यांनी'' नको त्याला सांगते मी तुमच्याकडूनच घ्या... कशाला उगच माझ्याकडे ठेवुन घ्या'' असे सांगून श्रीमती रेश्मा नाईक यांनी लाचेची रक्कम भाऊसाहेब यांना देण्यास सांगितल्याने मी सापळा पथकाला कोणताही ईशारा न दाखविता पंच क्रं. 1 श्रीमती

काणे यांचेसह सापळा पथकाच्या ठिकाणी परत आले. लोकसेविका श्रीमती नाईक यांनी लाचेची रक्कम भाऊसाहेब यांच्याकडे देण्यास सांगितल्याने भाऊसाहेब हे नेमके कोण आहेत याबाबत पोनि येळवे यांनी मला विचारले असता भाऊसाहेब हे आमचे जसखार गावचे ग्रामसेवक श्री. रूपम गावंड असे असल्याचे मी त्यांना सांगितले.त्यानंतर जसखार गावचे ग्रामसेवक हे लाचेची रक्कम घेण्यास तयार आहेत अगर कसे ? याबाबत ग्रामसेवक (भाऊसाहेब) यांची पडताळणी करणे आवष्यक असल्याचे पोनि श्रीमती येळवे यांनी सांगून पुढील आवश्यक कार्यवाही दिनांक 09/02/2024 रोजी करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 09/02/2024 रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर झाले. त्यानंतर लाचेच्या रक्कमेसबंधाने ग्रामसेवक किंवा लोकसेविका श्रीमती नाईक यांचा मला फोन येण्याची वाट पाहीली परंतू बराच वेळ झाला तरी त्यांचा फोन न आल्याने पोनि. अरूंधती येळवे यांचे सूचनेनूसार मी माझे मोबाईल नं. 7977608754 वरून लोकसेविका श्रीमती. नाईक यांचे मोबाईल फोन क्र. 9324251868 वर फोन करून स्पीकर सुरू केला. त्यावेळी फोनची रिंग वाजल्यानंतर लोकसेविका श्रीमती नाईक यांनी फोन कट केला.

त्यानंतर काहीवेळाने माइया व्हॉटस्अप मोबाईल नं. 7977608754 वर लोकसेविका श्रीमती नाईक यांचे व्हॉटस्अप नं. 9324251868 वरून फोन आला. त्यावेळी मी सदरचा कॉल रिसीव्ह केला असता, समोरून कोणाचाही आवाज येत नसल्याने फोन कट केला.

त्यानंतर पोनि. अरूंधती येळवे यांचे सुचनेप्रमाणे मी माइया व्हॉटस्अप मोबाईल नं. 7977608754 वरून 17.01 वाजता लोकसेविका श्रीमती नाईक यांचे व्हॉटस्अप मोबाईल नं. 9324251868 वर फोन केला असता, लोकसेविका श्रीमती नाईक यांनी सदरचा कॉल रिसीव्ह केला. त्यावेळी मी लोकसेविका यांना " ग्रामसेवक आज आलेच नाय....मग काय ? कस काय तुमचे ते काल ठरलेला ते दयायचे ? पंचवीस हजार....." असे विचारले असता, लोकसेविका श्रीमती नाईक यांनी " नाय आता आलेले ते इथ.... गडबडीत गेले ते " असे सांगितले. त्यावर मी दोन-तीन दिवस महाबळेष्वर येथे जात असल्याचे लोकसेविका श्रीमती नाईक यांना सांगितले असता, लोकसेविका श्रीमती नाईक यांनी " मी बोलते त्यांना, तुम्हीच कॉरडीनेट करा आणि इथुन घेऊन जा म्हणून इस्टीमेट." " करते मी त्यांना फोन " असे बोलून फोन कट केला. त्यानंतर बराच वेळ लोकसेविका श्रीमती नाईक यांचा फोन न आल्याने कारवाई स्थगित करून पुढील कारवाई लोकसेविका श्रीमती नाईक यांचा फोन आल्यानंतर करण्यात येणार असल्याचे पोनि. अरूंधती येळवे यांनी आम्हास सुचना दिल्या. सदरचे फोनवरील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर मी माझे कुटूंबासमवेत बाहेरगावी गेली होती. बाहेरगावावरून आल्यानंतर दिनांक 20/02/2024 रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात उपस्थित राहीले. त्यावेळी पोनि श्रीमती येळवे यांनी मला लोकसेविका किंवा ग्रामसेवक यांचा फोन वगैरे आला आहे अगर कसे? याबात विचारले असता लोकसेविका श्रीमती नाईक यांनी सांगितलेप्रमाणे ग्रामसेवक श्री. गावंड यांचा मला फोन आला नसल्याचे मी सांगितले. त्यावेळी ग्रामसेवक श्री.गावंड यांना फोन करून लाचेच्या रक्कमे सबंधाने खात्री करण्याचा निर्णय घेवुन पोनि. अरुधंती येळवे यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नं. 7977608754 वरून जसखार गावचे ग्रामसेवक श्री. रूपम गावंड यांचे मोबाईल फोन क्र. 9220223320 वर फोन करून स्पीकर चालू केला असता जसखार गावचे ग्रामसेवक श्री. रूपम गावंड यांनी सदरचा कॉल रिसीव्ह केला. त्यावेळी तक्रारदार श्रीमती प्रणाली म्हात्रे या जसखार गावचे ग्रामसेवक श्री. रूपम गावंड यांना ''मी काय बोलतेय त्या रेश्मा मॅडमनी आपल्या कामाचे ते पंचवीस हजार तुमच्याकडे दयायला सांगितलेले त्याच काय करु'' असे सांगितले असता ग्रामसेवक श्री. रूपम गावंड यांनी लाचेची रक्कम ''नाय नाय मला काय माझ्याकड काय नको तुमचा विषय तो. तुमचा तुम्ही करुन घ्या हा.''असे बोलून फोन कट केला. ती वेळ 15.20 वा.ची होती.

सदर संभाषणावरुन ग्रामसेवक श्री. गावंड हे लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार देत असुन त्याबाबत लोकसेविका श्रीमती नाईक यांच्याशी बोलणी करण्याबाबत मला सांगत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे दिनांक 21/02/2024 रोजी लाचेच्या रक्कमेसह लोकसेविका श्रीमती. नाईक यांना भेटून लाचेच्या रक्कमे संबधाने बोलणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दिनांक 21/02/2024 रोजी मी लाचेची रक्कम घेवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्रं. 1 श्रीमती दहिवले यांचे समवेत 12.50 वाजता ते 13.18 वाजे दरम्यान उरण, पंचायत समिती, बांधकाम विभाग येथे जावून अभियंता श्रीमती रेश्मा नाईक यांची भेट घेतली. मी सुरवातीस कामसंबंधी चर्चा केली. त्यानंतर मी लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, लोकसेविका श्रीमती नाईक यांनी '' कसं काय करणार....कारण माझ्याकडे नका देवू मॅडम ते.....त्यांच्याकडं दया ते..त्याचं आहे ते....त्यांच त्यांच्या हातात देवून '' असे बोलले असता मी'' आता तुम्हीच जबाबदारी घेतलेलीत ना मॅडम घ्या आता....'' असे सांगितले असता लोकसेविका यांनी '' नको.... जा आता. ''

असे सांगितले. त्यावेळी मी '' आता ते मी किती दिवस घेवून फिरु..'' असे विचारले असता लोकसेविका यांनी ''नाय माझा माझा विषयचं नाहीए तो....तो तिकडंचा विषय आत तिकडंच....'' असे बोलल्या असता मी'' तिकडचा कोणचा....नाव सांगा...'' असे बोलल्या असता लोकसेविका यांनी '' तिकडे.... प्रोजेक्ट ब्रान्चमध्ये....असतात ते एकटेच आहेत साहेब....त्यांना जावून भेटा....'' असे बोलल्या त्यानंतर मी '' आता मी तुम्ही सांगितल्याप्रमाणे आणलेले '' असे बोलले असता लोकसेविका श्रीमती. नाईक या '' नाय नको मॅडम, माझ्याकडे नको ते पैसे '' असे बोलुन 'काम त्यांनी अलिबाग येथे टपालाने पाठविलेले आहे. अलिबाग येथिल बांधकाम विभागातील पी.एस.कांबळे यांना जावून भेटा' असे सांगितले. त्यावेळी मी '' तुम्ही सांगणार का त्यांना?'' असे विचारले असता लोकसेविका यांनी '' हा सांगते ना'' असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 असे सापळा पथकाच्या ठिकाणी परत आलो. माझे व लोकसेविका श्रीमती नाईक यांचे झालेल्या संभाषणा दरम्यान लोकसेविका श्रीमती नाईक यांनी आमचे काम अलिबाग येथे टपालाने पाठविलेले असुन त्याकरीता अलिबाग येथिल बांधकाम विभागातील पी.एस.कांबळे यांना जावून भेटण्याबाबत तसेच लाचेची रक्कम श्री. कांबळे यांच्याकडे देण्याबाबत सांगत असल्याचे स्पष्ट झाल्याने बांधकाम विभाग, अलिबाग येथिल श्री. पी.एस.कांबळे यांची पडताळणी कारवाई दिनांक 22/02/2024 रोजी करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 22/02/2024 रोजी मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्रं. 1 श्रीमती दहिवले यांचे समवेत 13.21 वाजता ते 13.38 वाजे दरम्यान बांधकाम विभाग जिल्हा परिशद अलिबाग -रायगड येथे सहायक अभियंता श्री. कांबळे यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. कांबळे यांना सुरुवातीस मी उपसरपंच असल्याचे सांगुन उरण पंचायत समिती येथून रेश्मा नाईक मॅडमनी पाठविले असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी त्यांनी मला रेश्मा भोईर का याबाबत विचारले असता, मी त्यांना नाईक मॅडमने सांगितले. त्यानंतर रेश्मा नाईक यांनी आमचे इस्टिमेट टपालाने अलिबाग येथे पाठविले असल्याचे मी कांबळे यांना सागितले. त्यावर ते टपालात न पाठवता स्वतः घेवुन यायचे असे मला बोलले. त्यानंतर कामासंबधी चर्चे दरम्यान मी '' चाललं.....काय... रेश्मा मॅडम बोलल्या का तुमच्याशी काय?....'' असे बोलले असता, लोकसेवक श्री. कांबळे हे '' त्या नाय काय बोलल्या...पण आम्ही त्यांना ऑलरेडी सांगितलेलं असतं '' असे मला बोलल्या. त्यानंतर मी '' मला बोललेल्या की, पंचविस हजारात.... म्हणजे पंचविस हजार देस तिकडे सांगितलेल ....''असे बोलले असता, लोकसेवक श्री. कांबळे हे ''हा'' असे बोलुन '' तुमचं बिल देतो पास करुन.....तुमचं काम आता तासाभरात करुन देईल.....तुम्हाला मी शंभर काम करुन देईन....पण हयाचा फोन.... त्याचा फोन....'' असे बोलले. त्यानंतर झालेल्या चर्चे दरम्यान '' चांगल्या याच्यात ठेवून...पॅक करुन... स्टॅपलर मारुन याच्यात ठेवा...'' असे मला सांगुन अडीच तीन वाजेपर्यत येण्यास सांगितले व माझा मोबाईल नंबर मला विचारुन त्यांनी घेतला. त्यानंतर मी पंच क्रं 1 श्रीमती दहिवले पडताळणी पथकाच्या ठिकाणी परत आलो. माझे व लोकसेवक श्री. कांबळे यांचे झालेले संभाषणा दरम्यान लोकसेवक श्री.कांबळे यांनी लाचेची रक्कम रु. 25,000/- स्विकारण्याचे संमती दर्शविल्याने त्यांच्या विरुध्द लाचेचा सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. माझे व लोकसेवक श्री. कांबळे यांच्या संभाषणा दरम्यान श्रीमती. नाईक यांनी सांगितल्याप्रमाणे रु.25,000/- लाचेची रक्कम लोकसेवक श्री.कांबळे यांनी स्विकारण्याची संमती दर्शविल्याने त्यांचे विरुध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पोनि. श्रीमती अरूंधती येळवे यांनी पंचासमक्ष मला सापळापुर्व कारवाईबाबत थोडक्यात माहिती दिली. सापळापुर्व कार्यवाही दरम्यान पोशि. चैलकर यांनी सदर रक्कमेस अॅथ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा कागदी खाकी लिफाफा मध्ये ठेवून सदरचा लिफाफा माझे पर्समध्ये ठेवला. त्यानंतर पोनि. श्रीमती येळवे यांनी सापळापुर्व कारवाई पुर्ण करून सापळा कारवाईचे अनुशंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.

सापळापुर्व कार्यवाही झाल्यानंतर मी लाचेची रक्कम घेवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्रं. 1 श्रीमती दहिवले यांचे समवेत 16.41 वाजता ते 16.55 वाजे दरम्यान बांधकाम विभाग जिल्हा परिशद अलिबाग -रायगड येथे जावून सहायक अभियंता श्री. कांबळे यांची भेट घेतली. त्यावेळी सुरुवातीस आमचे काम झाले का याबाबत विचारले असता त्यांनी त्यांच्याकडील पेपर पाहून त्यातील नावे वाचुन जसखार गावातील कामाचे फाईल असल्याबाबत माझ्याकडे खात्री केली. त्यानंतर मी '' पंचवीस आहेत, मोजुन घ्या वाटल्यास,..... कप्यात?'' असे बोलुन लाचेचा रक्कमेचा कागदी लिफाफा पुढे केला असता श्री. कांबळे यांनी त्यांच्या उजव्या हाताने सदरचा लाचेच्या रक्कमेचा लिफाफा उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या कार्यालयीन टेबलच्या डाव्या बाजुस ठेवुन दिला. त्यावेळी मी लोकसेवक यांनी लाचेचा रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लोकसेवक श्री.कांबळे यांनी 06 विकास कामाचे अंदाजपत्रके माझ्या ताब्यात दिली. त्यानंतर सापळा पथकाने श्री. सतिष कांबळे यांना लाचेच्या रक्कमेसह 16.55 वा. ताब्यात घेतले आहे.

लोकसेविका श्रीमती नाईक यांचेविरुद्धही सदर प्रकरणी कारवाई करण्यात येणार असल्याचे मला पोनि श्रीमती

अरूंधती येळवे यांचेकडून समजले आहे.

तरी दिनांक 08/02/2024 रोजी लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेविका श्रीमती.रेश्मा ओंकार नाईक, वय 31 वर्षे, (वर्ग 2) सहायक अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती उरण, जि. रायगड रा. रूम नं.302, पंचवटी कॉ.ऑप. हौ.सोसा, प्लॉट नं. 166, से.नं. 23, जुईनगर, नवी मुंबई यांनी माझ्याकडे जसखार गाव उरण येथील विकास कामाचे अंदाजपत्रक मंजूरीच्या कामाकरीता रु. 30,000/- लाचेच्या रक्कमेची स्वतः करीता व लेकसेवक श्री. कांबळे यांचेकरीता मागणी करुन तडजोडी अंती रु. 25,000/- लाचेची रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दिनांक 21/02/2024 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती. रेश्मा नाईक यांनी लाचेची रक्कम बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलिबाग येथील सहायक अभियंता श्री. कांबळे यांच्याकडे देण्यास मला सांगुन लाचेची रक्कम देण्यासाठी मला प्रोत्साहन दिले. त्यानुसार दिनांक 22/02/2024 रोजी सापळा कारवाई दरम्यान श्री. सतिश वसंत कांबळे वय 52 वर्शे, सहायक अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अलिबाग, जि. रायगड रा. रूम नं.01,पारिजात सोसायटी, श्रीबाग तळमजला, अलिबाग, जि.रायगड यांनी माझ्याकडून रु. 25,000/- लाचेची रक्कम बांधकाम विभाग जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयात स्विकारली असता त्यांना 16.55 वाजता स्विकारले असता, रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे अशाप्रकारे लोकसेवक या नात्याने श्रीमती नाईक व श्री कांबळे यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग केल्याने त्यांच्या विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मला वाचून समजावून सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोनि. अरूंधती येळवे अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई हया करीत आहेत.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJAY PANDIT PATIL(I (Inspector)) / 1234 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / Informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Pranali

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY PANDIT PATI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 1234

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)